# वसई विरार शहर महानगरपालिका
# वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०६/०१/२०२५

## <u>प्रेसनोट</u>

चीनमधून आलेल्या नवीन विषाणू **मानवी मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही)** हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे. ज्यामुळे व श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरते. हा एक सामान्य रोग आहे जो सामान्यत: आरएसव्ही आणि फलू प्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातीला उदभवतो. हा विषाणू सर्वप्रथम नेदरलँडस मध्ये २००१ मध्ये आढळला आहे.

- नागरीकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये या संदर्भातील सुचनांचे पालन करण्यात यावे.

**❖ <u>काय करावे :</u>**

- जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रूमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.
- साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारीत सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवा.
- ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणापासून दूर राहा.
- भरपूर पाणी प्या आणि पोष्टिक खा.
- संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्यावी.

**❖ <u>काय करू नये :</u>**

- हस्तांदोलन करू नये.
- टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर करू नये.
- आजारी लोकांशी जवळचा संपर्क टाळा.
- डोळे, नाक आणि तोंडला वारंवार स्पर्श करु नये.
- सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये.
- डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेऊ नये.

टिप - कोणतीही सदृश्य लक्षणे आढळल्यास नजिकच्या रूग्णालयास किंवा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास संपर्क साधावा.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका